## कुत्र्याचा चावा :-

उष्ण कटिबंधातील कुत्रे समशीतोष्ण कटिबंधातील कुत्र्याप्रमाणे क्वचितच पाळीव असतात. साहजिकच ते सैरावैरा वाटेल त्या ठिकाणी हिंडणारे असतात. ते जरी रॅबीज नावाच्या लोगाने पछाडलेले नसले तरी त्यांच्या चाव्यामुळे रक्त दुषित होण्याचा दाट संभव असतो. म्हणून कोणास कुत्रा चावल्यास त्याच्या जीवनाला धोका आहे असे मानुन ताबडतोब प्रथमोपचाराची व वैद्यकीय मदतीची योजना करणे अगदी आवश्यक आहे. ते जनावर निरीक्षणाकरीता अडकवून ठेवण्याचा प्रयत्न करावा. ( ही गोष्ट काळजीपुर्वक करावी.) जर त्याला रॅबीज रोगाचा संसर्ग झाला असेल तर तो इतर लोकांना व जनावारांना घातक आहे व त्याचा नाश करणे जरुर आहे. जर त्याला ठार करावयाचे असेल तर त्याचे मस्तक सुरक्षित ठेवावे म्हणजे त्याच्या मेंदूची प्रयोगशाळेत तपासणी करुन तो रॅबिड म्हणजे रॅबीज रोगाने पछाडलेला होता किंवा काय हे ठरविता येईल.



## उपचार :-

१) वैद्यकिय इलाजाची एकदम व्यवस्था करा.

२) रक्तस्त्राव चालु ठेवा, रॅबीजचे जंतू मध्यवर्ती मज्जा संस्थेपर्यंत मज्जातंतूतर्फे पोचतात मात्र सर्पदंशाप्रमाणे रक्ताभिसरणातून फैलावत नाहीत. म्हणून आवळपट्यांची जरुरी नसली तरी पट्टा बांधल्याने रक्त साकळून जमा झाल्याने रक्तस्त्राव वाढविल्यास त्याची मदत होते.

३) चावलेला भाग खालच्या बाजूने ठेवा

४) पोटॅशियम परमॅगनेटच्या फिक्या द्रवाने शक्य असल्यास धुवून काढा.

५) जर कुत्रा रॅबिड होता असे ठाऊक असेल तर तो चावल्यानंतर थोड्या मिनिटाच्या आत डॉक्टर न मिळाल्यास जखम जाळून टाका. हे कार्बालिक किंवा नैट्रिक ॲसिड सारख्या जाळणारा द्रव आगपेटीतल काडीच्या किंवा इतर टोकदार काडीच्या साह्याने जखमेत लावल्याने, चांगल्या प्रकारे होऊ शकते. सर्व जंतू मारण्याकरता प्रत्येत दाताच्या व्रणामध्ये जाळणारा द्रव पदार्थ घातला पाहिजे. जर कुत्रा चावल्यावर अर्धा तास गेला असेल तर जखम जाळण्याची जरुरी नाही.

६) जखमेवर कोरडे आच्छादन द्या.